# नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती-परिवहन मंत्री

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**



राज्यातील वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आजपासून म्हणजेच 9 मार्चपासून नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात निर्णय घेतला जाणार असून, त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे माहिती मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील 5 लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असून शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्य शासनाला याबाबत स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्यास सांगितले आहे.

महाराष्ट्राचे परिवहन मंत्री या नात्याने केंद्र शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहारानंतर केंद्राने कार्यालयीन स्मरणपत्राद्वारे ही माहिती दिली आहे. मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, 2019 अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे.

मोटार वाहन अधिनियम, 1988 मधील कलम 67 (3) नुसार राज्य शासनाला प्रवासी व माल वाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येईल, असे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे.



याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेले ऑटो रिक्षा परवाने अनेक ठिकाणी एकाच घरात देण्यात आलेले आहेत, काही परवाने बांग्लादेशी नागरिकांना अवैध रितीने दिल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आता पर्यंत राज्यभरात सरसकट 14 लाखांपर्यंत ऑटो रिक्षा परवाने दिलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबतचा विषय स्थानिक परिस्थिती आणि वाहतुकीच्या गरजेनुसार राज्य शासनाने योग्य पद्धतीने हाताळण्याचा सल्ला केंद्र शासनाने दिला आहे.

राज्यातील नागरिकांना अधिक चांगली आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन लवकरच आवश्यक त्या धोरणात्मक निर्णयांवर विचार करणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक सांगितले.

# मुंबई ते मॉरिशस थेट 'कनेक्शन'

## सातासमुद्रापार मराठी भाषेचा डंका वाजणार अन् व्यापाराची नवी दारे उघडणार



**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यातील मैत्रीचे नाते आता केवळ सांस्कृतिक न राहता ते आर्थिक आणि व्यापारी दृष्टिकोनातून नव्या उंचीवर नेण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. "महाराष्ट्रातील शेतीमाल, इथेनॉल उत्पादन आणि सौरऊर्जेसह फार्मा क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," अशी ग्वाही पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे मॉरिशसच्या उच्चायुक्त शिलाबाई बप्पू यांनी त्यांची भेट घेतली, तेव्हा या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

या भेटीत केवळ व्यापारावरच नव्हे, तर 'मराठी' अस्मितेवरही विशेष भर देण्यात आला. मॉरिशसमध्ये मोठ्या संख्येने असलेल्या मराठी वंशाच्या समाजासाठी मराठी भाषा शिक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि संस्थात्मक संबंध दृढ करण्याबाबत दोन्ही नेत्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. महाराष्ट्रातून मॉरिशसला फळे, भाजीपाला आणि धान्य निर्यात करण्यासाठी राज्याची कृषी पणन यंत्रणा अधिक सुलभ प्रक्रिया राबवणार आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे सोपे होणार आहे. भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' (शेजारी प्रथम) धोरणाला महाराष्ट्राचे पूर्ण पाठबळ असल्याचे सांगत मंत्री रावल यांनी जवाहरलाल नेहरू पोर्ट (JNPT) सारख्या बंदरांच्या माध्यमातून सागरी वाहतूक आणि थेट परकीय गुंतवणूक (FDI) वाढवण्याचे संकेत दिले. मॉरिशसच्या उच्चायुक्तांनी यावेळी जयकुमार रावल यांना मॉरिशस भेटीचे निमंत्रण दिले असून, आगामी काळात फूड पार्क आणि कोल्ड चेन पायाभूत सुविधांच्या विकासात दोन्ही देश एकत्र काम करताना दिसतील.

मुंबईच्या आर्थिक शक्तीचा वापर करून मॉरिशसशी असलेले हे द्विपक्षीय संबंध राज्याच्या प्रगतीला नवी दिशा देणारे ठरतील, अशी चिन्हे आता स्पष्ट दिसत आहेत.

# भारतीय क्रिकेट संघात संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ-मुख्यमंत्री

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

आयसीसी मेन्स टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत संघाच्या कामगिरीचे कौतुक केले. भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत एक अपवाद वगळता सर्व सामने जिंकत वर्चस्व गाजविले. संघभावना, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट मिलाफ संघात पाहायला मिळाला. या कामगिरीबद्दल भारतीय संघाचे कर्णधार सूर्यकुमार यादव तसेच प्रशिक्षक गौतम गंभीर यासह सर्व संघाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले.

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव विधानसभा अध्यक्ष अँड. राहुल नार्वेकर यांनी संमत केल्याचे घोषित केले.

विशेष अभिनंदन प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतीय क्रिकेटचा गौरवशाली इतिहास कपिल देव यांच्या नेतृत्वाखालील संघाने 1983 मध्ये लॉर्ड्स येथे पहिला विश्वचषक जिंकल्यापासून सुरू झाला. त्यानंतर महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखाली भारताने 2007 मध्ये पहिला टी-20 विश्वचषक आणि 2011 मध्ये एकदिवसीय विश्वचषक जिंकला. आता 2024 आणि 2026 मध्ये पुन्हा टी-20 विश्वचषक जिंकून भारताने क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे हे मुंबईचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुंबई आणि महाराष्ट्राने भारतीय क्रिकेटला अनेक महान खेळाडू दिले असून ग्रामीण आणि सामान्य कुटुंबांतील खेळाडू आज आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत, ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळ (बीसीसीआय) यांच्या कार्याचाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरव केला. विधानसभेच्या वतीने भारतीय संघाला अभिनंदनाचा प्रस्ताव पाठविण्यात यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कालच्या अंतिम सामन्यातील या विजयासह भारताने तिसऱ्यांदा टी-20 विश्वचषक जिंकत नवा इतिहास रचला असून तीन वेळा ही स्पर्धा जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. तसेच सलग दुसऱ्यांदा टी-20 विश्वचषक जिंकण्याची कामगिरीही भारताने प्रथमच केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम या जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने 20 षटकांत 5 बाद 255 धावांचा विक्रमी डोंगर उभा केला. टी-20 विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील हा आजपर्यंतचा सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारतीय गोलंदाजांनी न्यूझीलंडचा डाव 159 धावांत गुंडाळत शानदार विजय मिळविला असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, फलंदाजांनी या सामन्यात उत्कृष्ट कामगिरी केली. फलंदाज संजू सॅमसन यांनी 46 चेंडूत 89 धावा करून संघाला मजबूत सुरुवात दिली. तसेच अभिषेक शर्मा यांनी अवघ्या 21 चेंडूत 52 धावा करत स्पर्धेतील सर्वात जलद अर्धशतकांपैकी एक नोंदविले. इशान किशन यांनी 25 चेंडूत 54 धावा करत धडाकेबाज फलंदाजी केली. तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनीही महत्त्वपूर्ण धावा जोडून संघाची धावसंख्या भक्कम केली. गोलंदाजीत जसप्रित बुमरा यांनी चार बळी घेत निर्णायक कामगिरी केली. संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक किफायतशीर गोलंदाज म्हणून त्यांनी संघाच्या विजयात मोठा वाटा उचलला. उपांत्य फेरीत त्यांच्या निर्णायक गोलंदाजीमुळे सामना भारताच्या बाजूने फिरल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच अक्षर पटेल यांनी तीन बळी घेत संघाला महत्त्वाची साथ दिली, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# बेस्ट बससेवेबाबत मुंबईतील आमदारासमवेत बैठक घेणार राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

मुंबईतील बेस्ट बससेवाबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी मुंबईतील सर्व स्थानिक आमदार यांच्यासमवेत बैठक घेण्यात येईल. या बैठकीस परिवहन विभागाचे अधिकारी यांनाही बोलवण्यात येईल असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य सुनील शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य प्रवीण दरेकर, सचिन अहिर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणल्या, मुंबईची लोकसंख्या आणि प्रवाशांची गरज लक्षात घेता शहरात किमान १० हजार बसची आवश्यकता आहे. यासाठी बेस्टने विविध कंत्राटदारांना ६,५५५ बस पुरवठ्यासाठी वर्क ऑर्डर दिल्या होत्या. मात्र कंत्राटदारांकडून बस वेळेत उपलब्ध होऊ न शकल्याने अपेक्षित प्रमाणात बससेवा वाढवता आली नाही. मार्च २०२३ पर्यंत १,३०० बस उपलब्ध होणे अपेक्षित होते, मात्र सध्या केवळ ६८५ बस उपलब्ध झाल्या आहेत.

स्क्रॅपिंग पॉलिसीनुसार १५ वर्षांनंतर बस स्क्रॅप केल्या जात असल्याने बेस्टच्या मालकीच्या बसची संख्या कमी झाली आहे. पूर्वी बेस्टकडे १,८८२ मालकीच्या बस होत्या, मात्र सध्या ही संख्या २४९ इतकी राहिली आहे. उर्वरित बस भाडेतत्त्वावर घेतल्या असून सध्या २,५५८ भाडेतत्त्वावरील बस उपलब्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.


**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 9820648283| Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **ARGFL/SME-LAP/MUM-1/1481 & APPL00008546** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स मुस्कान ट्रेडिंग कंपनी (कर्जदार) चे दुकान, रूम नंबर २, बीके नंबर ८५, देवजी पॅलेस, एसईएस स्कूल जवळ, शहाड स्टेशन रोड, उल्हासनगर–१, ठाणे: ४२१००१. | |
| सह–कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती रिंकू सुरेंद्र छाब्रा (सह–कर्जदार) फ्लॅट नंबर १०१, पहिला मजला, विंग ई ०२, रोझवुड योगीधाम फेज ३, गौरी पाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१. (३) श्री. सुरेंद्र सिंग डी छाब्रा (सह–कर्जदार) फ्लॅट नंबर १०१, पहिला मजला, विंग ई ०२, रोझवुड योगीधाम फेज ३, गौरी पाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१. (४) मेसर्स. शुभम टेक्सटाईल्स (सह–कर्जदार) चे दुकान रूम नंबर २, बीके नंबर ८५, देवजी पॅलेस, एसईएस स्कूल जवळ, शहाड स्टेशन रोड, उल्हासनगर–१, ठाणे: ४२१००१. | |
| मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट नंबर १०१, पहिला मजला, विंग ई ०२, योगीधाम ई–२, रोझवुड सीएचएस, योगीधाम फेज , गौरीपाडा, कल्याण पश्चिम, ठाणे: ४२१३०१. | |
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु. ६४,१९,८३०/– (रुपये चौसष्ट लाख एकोणीस हजार आठशे तीस फक्त) |
| लिलावाची तारीख | ३० मार्च २०२६ |
| राखीव किंमत | रु. ६७,०२,७५०/– (रुपये सडूसष्ठ लाख दोन हजार सातशे पन्नास फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु.१०,०००/– (रुपये दहा हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २३ मार्च २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | २७ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३० मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी. | |

हे प्रकाशन नियम ९(१) आणि ८(५) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ०९ मार्च २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता


# भांडवली बाजारातील ' बॉण्ड'च्या माध्यमातून शहरांच्या विकासाला निधीचे बळ-मुख्यमंत्री

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

महानगरपालिकांना आपल्या विविध विकास कामांसाठी भांडवली बाजारात बॉण्ड जारी करून निधी उभारता येतो. नाशिक महापालिकेप्रमाणे ' इनोव्हेटिव्ह फंड' निर्माण करून विकासाला निश्चितच निधीचे बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. बीकेसी येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये नाशिक महापालिकेच्या ग्रीन बॉण्डचे लिस्टिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते ' रिंगिंग बेल' वाजवून करण्यात आले.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, नाशिकच्या महापौर श्रीमती हिमगौरी आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चौहान, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, नाशिक कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंग, महानगरपालिका आयुक्त श्रीमती मनीषा खत्री, आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक महानगरपालिकेने एकाच आर्थिक वर्षात प्रथम खाजगी प्लेसमेंट आणि आता सार्वजनिकरित्या असे दोन्ही म्युनिसिपल बॉण्ड जारी करून या महापालिकेने भांडवली बाजारात प्रवेश केला आहे. भांडवली बाजाराच्या माध्यमातून महापालिकांनी निधी उभा करून लोकोपयोगी कामे केली पाहिजेत. यासाठी केंद्र शासनाने योजनादेखील घोषित केली आहे. पहिल्या टप्प्यात २०० कोटी रुपयांपर्यंतचे बॉण्ड्स काढण्याकरिता केंद्राने मान्यता दिली होती. याचे यश बघता केंद्रीय अर्थसंकल्पात या बॉण्डची मर्यादा १ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. याकरिता देण्यात येणारे प्रोत्साहन मूल्यदेखील २०० कोटी रुपयांपर्यंत करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी नाशिक महानगरक्षेत्रात जवळपास २५ हजार कोटींची विकासाची कामे सुरू करण्यात आली आहेत. कुंभमेळ्यासाठी करण्यात येणाऱ्या विकास कामांमुळे निर्माण होणारी व्यवस्था कुंभ साठीच नाही, तर नाशिक शहर विकसित महानगरांच्या श्रेणीमध्ये आणण्यास कारणीभूत ठरणार आहे. यामुळे पुढील काळात नाशिक हे गुंतवणुकीचे चुंबक म्हणून उदयास येणार आहे, असा आशावादही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. नाशिक महापालिकेने या दोन्ही टप्प्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. केंद्र शासनाच्या प्रोत्साहन मूल्य आणि अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून नाशिक महापालिकेला बिनव्याजी पैसे मिळणार आहेत. या बॉण्डच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीद्वारे नाशिक महापालिका सार्वजनिक हिताचे पाणीपुरवठा संबंधित प्रकल्प पूर्ण करणार आहे. यामुळे पाण्याची गळती ४७ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत कमी होणार आहे. शहरी विकासातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या बॉण्डचा उपयोग होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.राज्यातील छोट्या महापालिकांमधील विकास कामे करण्यासाठी एकत्रितपणे १ हजार कोटी रुपयांचे अशाच प्रकारचे बॉण्ड भांडवली बाजारात काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरून महापालिकांनाही केंद्र शासनाच्या या योजनांचा लाभ मिळेल. नाशिक महापालिकेने अशाच पद्धतीने इनोव्हेटिव्ह फंडच्या माध्यमातून गुणात्मकदृष्ट्या शहराचा विकास करावा, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

कार्यक्रमादरम्यान नॅशनल स्टॉक्स एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष चौहान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नाशिक महापालिकेच्या महानगर आयुक्त मनीषा खत्री यांनी बोंड विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी सोनटक्के यांनी केले कार्यक्रमाला नाशिक महापालिकेतील लोकप्रतिनिधी, तथा अधिकारी उपस्थित होते.

# समतानगर पुनर्विकास प्रकल्प एप्रिलपासून पुन्हा सुरू होणार

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

समतानगर कांदिवली (पूर्व) येथील मध्यम उत्पन्न गटाच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम १ एप्रिल २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात येत आहे. या कामाच्या प्रगतीचा दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जाईल. या कामात विलंब झाल्यास विकासकावर कारवाई करण्यात येईल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य श्रीकांत भारतीय यांनी विधान परिषदेत या विषयी प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भाई जगताप, प्रवीण दरेकर, अनिल परब यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, समतानगर येथील प्रकल्पासंदर्भात राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या प्रकल्पातील ३१८ निष्कासित सदनिकाधारकांपैकी ३१० जणांचे भाडे मार्च २०२६ पर्यंत देण्यात आले असून उर्वरित आठ जणांचे भाडे देण्याचे आदेशही देण्यात येतील. तसेच दरवर्षीचे भाडे आगावू देण्याबाबत सूचित केले जाईल.

तसेच भाडेकरूंना देय असलेल्या भाड्याबाबत कोणतीही तक्रार राहू नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असेही मंत्री देसाई यांनी सांगितले.अधिवेशन संपल्यानंतर सर्व संबंधितांची या विषयी पुन्हा बैठक घेतली जाईल. या बैठकीस लोकप्रतिनिधी, म्हाडा अधिकारी तसेच गृहनिर्माण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, भाडेकरूंचे प्रतिनिधी यांनाही निमंत्रित केले जाईल असेही मंत्री देसाई यांनी सांगितले.

# महिला आयोगासाठी निधीची कमतरता नाही - महिला व बालविकास राज्यमंत्री

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**



राज्य महिला आयोगाच्या मागणीनुसार शासनामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. निधीची कमतरता भासू दिली जात नाही, असे महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विधानसभेत सांगितले. आयोगास मागणीनुसार दरवर्षी निधी वाढवून दिला जात असून यावर्षी १८ कोटी ३५ लाखांची तरतूद करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री जयंत पाटील, विजय वडेट्टीवार यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकरिता एकूण ३५ पदे मंजूर असून त्यापैकी नियमित १८ आणि बाह्ययंत्रणेद्वारे १७ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत आयोगातील कोणतेही पद रिक्त नाही. आयोगाचा नवीन आकृतीबंध आराखडा मंत्रिमंडळासमोर मांडला आहे. आराखडा मंजुरीनंतर वाढीव कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जातील. सध्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा विचार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

महिला दिनानिमित्त ८ मार्च रोजी एक पोर्टल लाँच करण्यात आले आहे. या माध्यमातून सायबर गुन्ह्यांचे निराकरण करण्यास मदत होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# भारतीय क्रिकेट संघाच्या विजयाने देशभरात जल्लोष - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अहमदाबाद येथे भारतीय क्रिकेट संघाने ऐतिहासिक विजय मिळविल्यामुळे देशभरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विजयाने क्रिकेट विश्वात भारताचा गौरव उंचावला आहे. भारतीय संघाने दाखवलेल्या जिद्द, आत्मविश्वास आणि उत्कृष्ट सांघिक खेळामुळे पुन्हा एकदा क्रिकेट जगतात देशाचा अलौकिक गौरव झाला असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. त्यावेळी ते बोलत होते.

या देदिप्यमान यशाबद्दल भारतीय क्रिकेट संघ, प्रशिक्षक मंडळ तसेच बीसीसीआयचे चेअरमन जय शाह यांचे राज्यशासन आणि राज्यातील जनतेच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करत भारतीय संघाची विजयी पताका अशीच उंचावत राहो, अशा शुभेच्छा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईतील वानखेडे स्टेडियम येथे झालेल्या उपांत्य फेरीत भारताने इंग्लंडचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यानंतर अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करत विश्वचषक जिंकला. या विजयासह सलग दोन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला असून भारताने २००७, २०२४ आणि २०२६ अशा तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा मान मिळवला आहे. हा केवळ क्रिकेटमधील विजय नसून भारतीय खेळाडूंच्या जिद्दीचा, संघभावनेचा आणि विश्वासाचा प्रतीक असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले.

भारतीय संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर, कर्णधार सूर्यकुमार यादव, फलंदाज संजू सॅम्सन, तसेच गोलंदाज जसप्रीत बूमरा यांच्यासह संपूर्ण संघाचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. अंतिम सामन्यात भारतीय गोलंदाजांनी प्रभावी कामगिरी करत न्यूझीलंडला पराभूत केले, तर संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे दर्शन घडवले असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.


**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 9820648283| Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00014430** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स श्री शक्ती मर्चेंडायझिंग (कर्जदार) फ्लॅट क्रमांक ६०४, सी विंग, आकृती आंगन, होली फॅमिली स्कूल जवळ, ठाणे: ४००६०७. महाराष्ट्र. | |
| सह–कर्जदाराचे नाव: (२) सुश्री पौण राजन (सह–कर्जदार) सी–६०४, आकृती आर्केड सीएचएस लिमिटेड, घोडबंदर रोड, आनंद नगर, होली फॅमिली स्कूल जवळ, ठाणे: ४००६०७. महाराष्ट्र. (३) श्री. राजन ए (सह–कर्जदार) सी–६०४, आकृती आर्केड सीएचएस लिमिटेड, घोडबंदर रोड, आनंद नगर, होली फॅमिली स्कूल जवळ, ठाणे: ४००६०७. महाराष्ट्र | |
| मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्रमांक सी–६०४, सहावा मजला सी विंग आकृती आर्केड सीएचएस लिमिटेड, आनंद नगर, विहंग व्हॅली फेज १ जवळ, प्राईड रेसिडेन्सी रोड, सर्व्हे क्रमांक ३८, बोरीवडे गाव, ठाणे पश्चिम: ४००६१५. महाराष्ट्र. | |
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | रु.६८,६५,३५६/– (रुपये अडूसष्ठ लाख पासष्ट हजार तीनशे छपन्न फक्त.) |
| लिलावाची तारीख | ३० मार्च २०२६ |
| राखीव किंमत | रु.८५,७८,४४०/– (रुपये पंच्यांशी लाख अठ्यात्तर हजार चारशे चाळीस फक्त.) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु.१०,०००/– (रुपये दहा हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २३ मार्च २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | २७ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३० मार्च २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी. | |

हे प्रकाशन नियम ९(१) आणि ८(५) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना १५ दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ०९ मार्च २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता


**महाराष्ट्र शासन**
**इलाखा शहर विभाग, (सा.बां.)**
**ई-निविदा सुचना क्र. ९८ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५/२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थाकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | एल्फिन्स्टन कॉलेज इमारती, मुंबई येथील पहिल्या मजल्यावरील इंग्रजी विभागाचे नूतनीकरण करणे. | ९.६८ |
| २ | व्ही.पी. रोड, मुंबई येथील पोलिस कर्मचारी निवासस्थानाचे बाह्य प्लास्टर आणि रंगकाम करणे. | २६.७९ |
| ३ | उच्च न्यायालय मुंबई येथे उच्च न्यायालय ॲनेक्स इमारत सिव्हील काम माननीय न्यायाधीशांसाठी एक न्यायालय कक्ष आणि एक कक्ष निर्माण करणे. (दक्षिण बाजू) | ४१.५५ |
| ४ | उच्च न्यायालय मुंबई विस्तार इमारत येथील पीडब्ल्यूडी विस्तार इमारत महाराष्ट्र ॲडव्होकेट वेलफेअर कार्यालय येथे दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | १५.३२ |
| ५ | उच्च न्यायालय मुंबई येथे उच्च न्यायालय ॲनेक्स इमारत फर्निचर काम माननीय न्यायाधीशांसाठी एक न्यायालय कक्ष आणि एक कक्ष निर्माण करणे. (दक्षिण बाजू) | १५.३३ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. ९.३.२०२६ ते दि. १६.३.२०२६ पर्यंत.
ई-निविदा उघडणे दि. १७.३.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http://mahatenders.gov.in

**जा.क्रं. इशवि/निलि / २०७७**
**कार्यकारी अभियंता**
**इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**२ रा मजला, बांधकाम भवन,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट,**
**मुंबई- ४०० ००१.**
**Email: presidency.ee@mahapwd.gov.in**
**दिनांक : ६/३/२०२६**

**सही/-**
**(व्ही. ए. पाटसकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर विभाग, मुंबई.**

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C६४१४**